MHJN020021832018

भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.१८९/२०१८
शामराव काळे व इतर वि. शासन व इतर
CNRMHJN020021832018

## निशाणी क्रमांक १५ वरील आदेश

सदरचा अर्ज मयत अर्जदार क्र.४ च्या वारसांतर्फे मयत अर्जदार क्र.४ चे वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला उशीर माफ होऊन मिळणेकामी दाखल केला आहे.

२) अर्जातील कथने थोडक्यात पुढील प्रमाणे –

भूसंपादन निर्देशन अर्जातील मुळ अर्जदार क्र.४ दिनांक १३/०४/२००६ रोजी मयत झाला आहे. त्यानंतर मयत अर्जदार क्र.४ चे वारस विहीत मुदतीत रेकॉर्डवर घेणे गरजेचे होते. परंतु, सदर मयत अर्जदाराचे वारसांना भूसंपादन अर्जाची माहिती नव्हती. इतर अर्जदारांकडून सदर अर्ज प्रलंबित असल्याची माहिती मयत अर्जदाराचे वारसांना मिळाली. अर्ज देण्यास जाणिवपुर्वक उशीर झालेला नाही. त्यामुळे मयत अर्जदार क्र.४ चे वारस रेकॉर्डवर घेण्याकामी झालेला उशीर माफ होऊन मिळण्याची मागणी मयत अर्जदाराच्या वारसांतर्फे प्रतिज्ञापुर्वक केली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) सामनेवाला क्र.१ तर्फे सदर अर्जास अर्जावरच आपले म्हणणे दिले आहे.

अर्जातील सर्व विरोधी कथने सामनेवाला क्र.१ ने नाकारली आहे. अर्जास १७ वर्ष ०४ महिने २० दिवसांचा उशीर झाला असून त्याचे योग्य कारण दिलेले नाही. त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा.

४) मयत अर्जदाराचे वारस व सामनेवाल क्र.१ तर्फे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) सदरच्या अर्जानुसार मुळ अर्जदार क्र.४ मयत झाल्यानंतर त्याचे वारस विहित मुदतीत अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, मुळ अर्जदार क्र.४ चे वारसांना सदर भूसंपादन अर्ज प्रलंबित असल्याचे माहित नव्हते. इतर अर्जदारांकडून सदर भूसंपादन अर्जाची माहिती मुळ अर्जदार क्र.४ चे वारसांना मिळाली. मुळ अर्जदार क्र.४ चे वारसांनी अर्ज देण्यास जाणिवपुर्वक उशीर केला नसल्याचे नमूद केले आहे. सामनेवाला क्र.१ तर्फे अर्जास विरोध दर्शविताना अर्जास १७ वर्षे ०४ महिने व २० दिवसांचा उशीर झाला असल्याचे नमूद करुन त्यासाठीचे अर्जातील कारण योग्य नसल्याचे स्पष्ट केले आहे.

६) मुळ अर्जदार क्र.४ चे वारसांनी सदरचा उशीर जाणिवपुर्वक केला केला नसला तरीही उशीराचा कालावधी १७ वर्षापेक्षा जास्त आहे. याकरिता मयत अर्जदार

क्र.४ चे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला उशीर मयत क्र.४ चे वारसांनी खर्चापोटी रक्कम रुपये ५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे मात्र) न्यायालयात जमा करण्याचे अटीवर माफ करणे न्यायोचित होणार आहे. याकरिता सदरचा अर्ज खर्चाचे अटीस अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्ज निशाणी क्र.१५ मयत क्र.४ चे वारसांनी खर्चापोटी रक्कम रुपये ५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे मात्र) न्यायालयात जमा करण्याचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२) मयत अर्जदार क्र.४ चे वारसांनी खर्चाचे अटीची पुर्तता केल्यावर रक्कम रुपये ५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे मात्र) शासनास वर्ग करण्यात यावी.

स्वाक्षरीत/–

(एन. एल. येवलेकर)

दिनांकः १९/१२/२०२३

दिवाणी न्यायाधीश व.स्तर

जालना

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय व.स्तर, जालना

दिनांक : १९/१२/२०२३

सही/–

एम. डी. आढे

लघुलेखक (ग्रेड–३)